चुकी आहे. Flying squad यांनी खोटा report सादर केला आहे. Sop प्रमाणे उपकार्यकारी अभियंता यांनी बिलाची दुरुस्ती ७ दिवसात करणे क्रमप्राप्त आहे. तसेच त्यांनी विना नोटीस आमचा विद्युत पुरवठा बंद केला.

सबब वरील सर्व विवेचंनावरुन मंच या निर्णयापर्यंत आला आहे की तक्रारदार ग्राहकास देण्यात आलेले ज्यादा assessment चे बिल हे भरारी पथक उस्मानाबाद यांच्या दि. २०.०४.२०१६ रोजीच्या स्थळ तपासणी वरुन मिटरचा display off झाल्याने देण्यात आले त्यामुळे सदरची तक्रार उद्भवलेली आहे. मंचाने सदरचे मिटर L&T Meter manufacturing company कडे analysis करण्यासाठीचे आदेश दिले. त्यानुसार company report दि.०४.०९.२०१७ प्रमाणे मिटरचे input circuit burnt झाल्याचे कळवीले. त्याचबरोबर गैरअर्जदार यांनी अर्जदाराची एप्रिल १६ पासुन कोणतीही दखल घेतल्याचे दिसुन येत नाही. ग्राहकाचा विद्युत पुरवठा ५६(१) नुसार बंद करण्यात आला नाही. ग्राहक अर्जदार प्रतिनिधी यांनी महावितरण कडुन विद्युत पुरवठा खंडीत झाल्यानंतर सदर कनेक्शन चालु ठेवणे पोटी रु.१२०१०१/ इतके डिझेल वापरल्याचे कथन केले परंतु त्यांनी मंचासमोर कोणत्याही प्रकारचा कागदोपत्री पुरावा सादर केला नाही.

वरील सर्व विवेंचनावरुन व कारण मिमांसे वरुन मंच खालील प्रमाणे निर्णय देत आहे.

## निर्णय

१. ग्राहक अर्जदार यांची 'अ' फॉर्ममधील तक्रार ग्राहक क्र. ६०६०७०७१८५२४ मुळे मान्य करण्यात येत आहे.

२. महावितरण कंपणीने ग्राहक अर्जदार ग्राहक क्र. ६०६०७०७१८५२४ बाबत दिलेले जादा assessment चे बिल रु.४४२१६१.६० रद्द करण्यात येत आहे.

३. ग्राहक अर्जदाराने दि.२४.०७.२०१७ रोजी पावती क्रमांक १०९२७६१ ने भरलेले रुपये ११०५४०/हे येणाऱ्या बिलापोटी समायोजित करण्यात यावेत.

४. भरारी पथक उस्मानाबाद यांच्या स्थळतपासणी दि. २०.०४.२०१६नुसार पाठीमागील तीन महिन्याचे जादा assessment चे ग्राहकास स्वतंत्र बिल देऊन ते वसुल करण्यात यावे

५. अर्जदाराने डिझेल खर्चापोटी मागणी केलेली रक्कम रु.१२०१०१/रु फेटाळण्यात येत आहे.

६. अर्जदार ग्राहक क्र. ६०६०७०७१८५२४ विद्युत पुरवठा हा जादा assessment चे बिल न भरल्याने दि.०३.०२.२०१७ रोजी कोणतीही पुर्व सुचना न देता कायमस्वरुपी बंद करण्यात आला . त्याचबरोबर त्यांच्या तक्रारीची दखल न घेण्यात आल्याने अर्जदाराच्या मागणीनुसार रक्कम रु. ३४००/- SOP म्हणुन महावितरणकडुन वसुल करण्यात यावेत (उपविभागाकडील उपविभागीय अधिकारी व सहाय्यक लेखापाल वाशी ) व ते ग्राहकास देण्यात यावे.